सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय ,बीड,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.0242-222604 E-Mail- rdc.beed2@gmail.com

वाचा :१. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30, 31, 34,41 व कलम 51

२.मा.मुख्यमंत्री महोदय यांची दि.12/03/2020 व्हिडिओ कॉन्फरन्स मधील सूचना व निर्देश

३. महाराष्ट्र शासन क्रमांक करोना 2020/प्रा.क्र.58/ आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020

४.अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग ,मंत्रालय मुंबई दिनांक 14 मार्च, 2020

५.साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च, 2020

६. महाराष्ट्र शासन क्रमांक करोना 2020/प्रा.क्र.58/ आरोग्य 5 दिनांक 15 मार्च, 2020

मशाका/आपत्ती व्यवस्थापन/कावी
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
क्र.कक्ष/कोरोना विषाणू/2020
बीड दिनांक:-20/03/2020

आदेश

राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च, 2020 पासून लागू करून खंड 2,3 व 4 मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आली असून स्वातंत्र्यरित्या निर्गमित करण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.3 अन्वये मुंबई,ठाणे ,नवी मुंबई पुणे ,पिंपरी चिंचवड व नागपूर या महापालिकांच्या कार्यक्षेत्रातील चित्रपटगृहे ,जलतरण तलाव , व्यायामशाळा ,नाट्यगृहे बंद करण्याबाबत सूचित केले होते.तथापि कोरोना विषाणूचा राज्यात वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता आणि पुणे जिल्ह्यासोबत बीड जिल्ह्याची निकटता व सामाजिक-आर्थिक बाबींमधील संलग्नता पाहता खालील आस्थापनांना दिनांक 31 मार्च, 2020 पर्यंत साथरोग प्रतिबंधक कायदा 1897 अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

अ.क्र.	विभाग /जबाबदार अधिकारी	आस्थापना
1	सर्व मुख्याधिकारी न.पा./न.पं, सर्व गटविकास अधिकारी, सर्व पोलीस निरीक्षक,. सर्व तलाठी, सर्व ग्रामसेवक.	**बीड जिल्ह्यातील सर्व केशकर्तनालय, सौंदर्य प्रसाधनगृह (ब्युटी पार्लर), मसाज सेंटर दि.31 मार्च, 2020 रोजीपर्यंत बंद ठेवण्यात यावेत.**

पोलीस विभागाने तात्काळ आवश्यक ती मदत वरील अधिका-यांना करावी व दिनांक 20/03/2020 मध्यरात्री 11.00 वाजेपर्यंत याची अंमलबजावणी सर्वांकडून करून घ्यावी.

उपरोक्त आदेशाचे अवाज्ञा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने भारतीय दंडसंहिता 1860 (45) याच्या कलम 188 शिक्षेसपात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल आणि ईतर कलमांसह दिवाणी व फौजदारी कार्यवाही करण्यात येईल.

20/03/20

(राहुल रेखावार, I.A.S)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,बीड

प्रती -1.सर्व विभाग प्रमुख ---------- जिल्हा बीड

प्रत - 1.मा. विभागीयआयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांचे कडेस माहितीस्तव सविनय सादर.
2.मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई३२यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
3.जिल्हा माहिती अधिकारी,माहिती कार्यालय बीड यांनी वरीलप्रमाणे तात्काळ प्रेस नोट प्रसिद्ध करावी.